वादीतर्फे साक्षीदार क्र.१- दुर्गाबाई श्रीराम बिरो,

उलट तपास प्रतिवादी क्र. १ आणि २ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. केला यांच्यातर्फे

३. मी अशिक्षीत आहे. मला इंग्रजी अथवा मराठी लिहिता वाचता येत नाही. मला केवळ सही करता येते. दावा इंग्रजी भाषेमध्ये असल्यामुळे दाव्यामध्ये काय लिहिले आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या शपथपत्रामध्ये काय लिहिले हे मला माहिती नाही. मी अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र माझ्या घरी आहे. मी प्रस्तुत दाव्यात दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत ही ठेक्याने दिली होती असे मी दाव्यात नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की ठेकापत्र हे माझ्या आणि गुंडेराव शामराव मसराम यांच्यामध्ये झाले होते. ठेकापत्र मी या न्यायालयात दाखल केले किंवा नाही, याची मला माहिती नाही. साक्षीदाराला नि.४ लगत, अनुक्रमांक २ वरील ठेकापत्र दाखविण्यात आले आणि सही तुमची आहे किंवा नाही हे विचारण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की त्यावरील सहया तिच्या नाही. साक्षीदाराला नि.क्र.१ दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की त्यावरील सही ही तिची नाही. साक्षीदाराला नि.क्र.२ दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की त्यावरील सही तिची नाही. साक्षीदाराला नि.क्र.३ दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की त्यावर तिची सही आहे. साक्षीदाराला नि.क्र.३८ दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की त्यावर तिची सही नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा दाखल करेपर्यंत म्हणजेच दिनांक २८/०४/२०१४ पर्यंत, ठेकापत्राबद्दल अथवा खरेदीपत्राबद्दल कोणताही दावा दाखल केलेला नव्हता. दावा दाखल करण्यासाठी मी वकीलाकडे गेले होते.

४. हे म्हणणे खरे नाही की पती मयत झाल्यानंतर मला पैशाची गरज होती. हे म्हणणे खरे आहे की माझे पती मयत झाल्यानंतर मी माझ्या वडीलांच्या घरी बामणी-बोरखेडी, जिल्हा-नागपुर येथे राहण्यासाठी गेले होते. हे म्हणणे खरे आहे की महाविरपुरे हे माझे काका आहेत. भोजराज पुरे आणि चंद्रहास पुरे हे माहाविरपुरे यांचे मुले आहेत. इंदुबाई पुरे ही माझी आई पुणाबाई हिची बहिण आहे. हे म्हणणे खरे आहे की मी ज्यावेळेस कन्हाण येथे येत होते त्यावेळेस मी त्यांच्याकडेच राहत होते. रामकिशोर इंद्रजीत रघुवंशी हे माझे वडील आहेत व चंद्रशेखर रघुवंशी हा माझा भाउ आहे. एकराम रघुनंदण बेहरखेडे हे माझे मामा आहेत.

न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

I.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.09.10 12:20:21 +0530

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

दिनांक ९.०९.२०२५
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : Shri. R. J. Khobragade (Gr.-II)